# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** जलसंपदा विभागाच्या नवेगाव खैरी जलाशयातुन नागपूर शहरास कच्चे
**{सार्व.आरो. अभि. विभाग}** पाणी पुरवठयाकरीता नागपूर महानगरपालिकेने JNNURM अंतर्गत नवेगांव खैरी येथे कच्चे पाणीपुरवठा केंद्राची उभारणी केली आहे. या केंद्रातुन नागपूर शहराच्या ६०% ते ६५% भागास पाणीपुरवठा करण्यात येतो. या पाणीपुरवठा केंद्राची उभारणी मे. CRSGC-SEW, हैद्राबाद या कंपनीकडून करण्यात आली, यात Intake well, Access bridge, ३३ KV Sub station, Pumping Station, BPT, २३०० मी.मी. व्यासाची BPT ते महादुला पंपीग स्टेशन पर्यंत २७ कि.मी. पाईपलाईन, कन्हान व कोलार नदीवरील पुल तसेच आमगाव नाल्यावरिल पुल इत्यादीचा समावेश आहे. मे. CRSGC-SEW, हैद्राबाद या कंपनीमार्फत उपरोक्त सर्व घटकांनसह जुन २०१५ पासुन ७ वर्षाचे कालावधीकरीता या केंद्राचे देखभाल दुरूस्तीचे(O&M) काम सुरू आहे. या केंद्राचे देखभाल दुरूस्तीचा ७ वर्षाचा कालावधी ३१ मे २०२२ ला संपुष्टात येणार आहे. नागपूर शहराच्या पाणीपुरवठयाच्या दृष्टिने हे केंद्र पुढे चालविणे आवश्यक असल्याने पुढीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१. नवेगाव खैरी, पेंच टप्पा-४ कच्चे पाणीपुरवठा केंद्राचे ५ वर्षाचे कालावधीकरीता सर्वसमावेशक (Comprehensive) सुस्थिती, संचलन व दुरूस्तीचे (O&M) कामाकरीता येणा-या रू. १२,१०,२८,९६८/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
२. सदर कामाकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यास्तव रितसर निविदा बोलाविण्यास्तव मंजुरी प्रदान करणे.
३. मे. CRSGC-SEW, हैद्राबाद या कंपनीकडून उपरोक्त केंद्राचे देखभाल दुरूस्तीचे काम सुरू असुन त्यांचे कंत्राटाची मुदत ३१ मे २०२२ ला संपुष्टात येणार असल्याने नविन कंत्राट कार्यान्वीत झाल्याच्या दिनांकापर्यंत किंवा ३ महिने ( १ जुन २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत) जे अगोदर होईल तोपर्यंत त्यांचे जुने मंजुर दराप्रमाणे तसेच कंत्राटातील अटी व शर्ती नुसार मुदतवाढ प्रदान करणे.

टिप :- १. या कामाचा खर्च म.न.पा.चे आय व्यय पद क्रमांक A४३८०१९४०७०१ अंतर्गत प्रस्तावित आहे.
२. सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- १९/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २०/०६/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१(भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार जलसंपदा विभागाच्या नवेगाव खैरी जलाशयातुन नागपूर शहरास कच्चे पाणी पुरवठयाकरीता नागपूर महानगरपालिकेने JNNURM अंतर्गत नवेगांव खैरी येथे कच्चे पाणीपुरवठा केंद्राची उभारणी केली आहे. या केंद्रातुन नागपूर शहराच्या ६०% ते ६५% भागास पाणीपुरवठा करण्यात येतो. या पाणीपुरवठा केंद्राची उभारणी मे. CRSGC-SEW, हैद्राबाद या कंपनीकडून करण्यात आली, यात Intake well, Access bridge, ३३ KV Sub station, Pumping Station, BPT, २३०० मी.मी. व्यासाची BPT ते महादुला पंपीग स्टेशन पर्यंत २७ कि.मी. पाईपलाईन, कन्हान व कोलार नदीवरील पुल तसेच आमगाव नाल्यावरिल पुल इत्यादीचा समावेश आहे. मे. CRSGC-SEW, हैद्राबाद या कंपनीमार्फत उपरोक्त सर्व घटकांनसह जुन २०१५ पासुन ७ वर्षाचे कालावधीकरीता या केंद्राचे देखभाल दुरूस्तीचे(O&M) काम सुरू आहे. या केंद्राचे

देखभाल दुरूस्तीचा ७ वर्षाचा कालावधी ३१ मे २०२२ ला संपुष्टात येणार आहे. नागपूर शहराच्या पाणीपुरवठयाच्या दृष्टिने हे केंद्र पुढे चालविणे आवश्यक असल्याने पुढीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१. नवेगाव खैरी, पेंच टप्पा-४ कच्चे पाणीपुरवठा केंद्राचे ५ वर्षाचे कालावधीकरीता सर्वसमावेशक (Comprehensive) सुस्थिती, संचलन व दुरूस्तीचे (O&M) कामाकरीता येणा-या रू. १२,१०,२८,९६८/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

२. सदर कामाकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यास्तव रितसर निविदा बोलाविण्यास्तव मंजुरी प्रदान करणे.

३. मे. CRSGC-SEW, हैद्राबाद या कंपनीकडून उपरोक्त केंद्राचे देखभाल दुरूस्तीचे काम सुरू असुन त्यांचे कंत्राटाची मुदत ३१ मे २०२२ ला संपुष्टात येणार असल्याने नविन कंत्राट कार्यान्वीत झाल्याच्या दिनांकापर्यंत किंवा ३ महिने ( १ जुन २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत) जे अगोदर होईल तोपर्यंत त्यांचे जुने मंजुर दराप्रमाणे तसेच कंत्राटातील अटी व शर्ती नुसार मुदतवाढ प्रदान करणे.

उपरोक्त प्रस्तावास तसेच या कामाचा खर्च म.न.पा.चे आय व्यय पद क्रमांक A४३८०१९४०७०१ अंतर्गत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. .

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**